# अलक्ष्मीचा नाश

लक्ष्मी आणि अलक्ष्मी या दोघी बहिणी आहेत. त्यातली अलक्ष्मी ही मोठी आणि लक्ष्मी ही धाकटी. दोघींचे स्वभाव अगदी परस्परविरुद्ध आहेत, पण मोठ्या बहिणीचा वडीलकीचा मान आहे. ती ज्या लोकांवर सत्ता गाजवत असेल, तिकडे लक्ष्मी फिरकतसुद्धा नाही. श्रीसूक्तांमध्ये दोघींचे वर्णन आहे. भूक, तहान आणि अस्वच्छता या गोष्टी अलक्ष्मीला फार आवडतात. कधीच न भागणारी भूक, सतत वाढत राहणारी तृष्णा आणि स्वच्छतेला जवळ फटकू न देणारी अस्वच्छता ही सारी ज्यांच्याजवळ आहेत, ती मंडळी अलक्ष्मीला फार प्रिय आहेत. सगळं आपल्यालाच हवं अशी आत्यंतिक स्वार्थाची वखवख ज्यांच्यामध्ये असेल, त्यांच्यावर अलक्ष्मी कृपा करीत असते. त्यांच्याच घरी राहायला तिला फार आवडतं.

तिच्या कृपेचा प्रसाद म्हणजे सारखं जे घडायला नको असेल तेच घडत राहतं. जी संपत्ती येते ती वाईट वासना आणि संकटंच सोबत आणते. समृद्धी ही गोष्टच अलक्ष्मीला आवडत नाही. तिची सत्ता असलेल्या घरात समृद्धीला थाराच नसतो. परस्परसंबंधामध्ये प्रेम-आदर-वात्सल्य या भावनाही तिला आवडत नाहीत. माणूसघाणेपणा तिला फार आवडतो. अशा घरात पैसे मोजून आणलेले नोकर-चाकरच टिकत नाहीत, मग प्रेमाची माणसं आणि गायी-घोड्यांसारखे पशू कसे टिकणार ? लोकांच्या मताची पर्वा करणे अलक्ष्मीला खपत नाही. त्यामुळे कीर्तीसुद्धा त्या घरात येणार नाही, याची ती काळजी घेते.

आता भूक आणि तहान या गोष्टींचं लक्ष्मीलासुद्धा वावडं नाही. पण तृप्ती हा तिचा आवडता गुण आहे. भूक आणि तहान यांची तृप्ती म्हणजे विकासाकडे जाणारी वाट आहे. स्वच्छता कटाक्षाने पाळणारे लोकच तिला फार प्रिय आहेत. शौच (आंतर्बाह्य स्वच्छता) आणि संतोष या दोन नियमांचं पालन ज्या घरात होतं, त्या घरात राहणं ती पसंत करते. पशूंबद्दल, नातेवाईक, मित्रांबद्दल, येणाऱ्या अतिथींबद्दल ज्यांना लोभ आहे. प्रेम, आदर, वात्सल्य या भावनांची जिथे कदर होते, त्या जागा ती सतत शोधत असते. मग येताना ती यश, कीर्ती, समृद्धी या तिच्या आवडत्या गोष्टी सोबत घेऊनच येते. दीर्घायुष्य, आरोग्य, सर्व साधन-संपत्ती व त्याबरोबर समाधान आणि शांती हे सारंही ती प्रसाद म्हणून देते.

ज्यांना लक्ष्मीची आराधना नीट करून तिला वश करून घेता आलेलं नाही, त्यांनी तिच्याबद्दल ती फार चंचल आहे अशी अफवा पसरविलेली आहे. ती

अत्यंत स्थिर आणि उदार आहे; मात्र अलक्ष्मीला आवडणारे गुण जोपासले जात आहेत अशी शंका जरा आली, तरी ती तिथे राहत नाही. अलक्ष्मीला दूर करूनच तिला बोलवावं लागतं. अलक्ष्मी दूर ठेवण्याची साधना आपल्यालाच करवी लागते.

लक्ष्मीने तुमचं घर आपल्या निवासासाठी निवडलं, तर साक्षात नारायणसुद्धा तिच्यासोबत येतात. कारण त्यांनाही तिला सोडून राहता येत नाही.

मग द्यायचं त्यांना आमंत्रण ?

– भीष्मराज बाम
('मना सज्जना' या पुस्तकातून)